# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ११
# सभा क्र. १४, दिनांक १०/६/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (साप्ताहिक) सभा शुक्रवार, दिनांक १०/६/२०२२ रोजी, सायंकाळी ५.०० (पाच) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. २२६**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि. १/५/२०२२ ते दि. ३१/०५/२०२२ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा. क्र. घ.क.व्य.का/८७१, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २२७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. ०१/०२/२०२२ ते दि. २८/०२/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१००८, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २२८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. ०१/०३/२०२२ ते दि. ३१/०३/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१००९, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २२९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील महापालिका सहाय्यक आयुक्त बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा विश्रामबागवाडा कार्यालयाकडील माहे एप्रिल २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआप–५/१२१९, दि. ३/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २३०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३०/०४/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१०५२, दि. ३/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २३१**

दि. १६/०५/२०२२ ते दि. २२/०५/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/१५१, दि. ६/६/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात जास्त रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २३२**

पुणे स्टेशन कै. तुकारामशेठ शिंदे वाहनतळ बेसमेंट, तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला व टेरेस येथील दुचाकी वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणेस देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार मे शारदा सर्व्हिसेस, सर्वे नं. ६५९/४, राजीव गांधीनगर, बिबवेवाडी, पुणे ४११०३७ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये १,०८,००,०६५=५८७ (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी आठ लक्ष पासष्ट पैसे पाचशे सत्याऐंशी फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ७७,७७,७७७/– (अक्षरी रक्कम रूपये सत्याहत्तर लक्ष सत्याहत्तर हजार सातशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा रक्कम रूपये ३०,२२,२८८=५८७ (अक्षरी रक्कम रूपये तीस लक्ष बावीस हजार दोनशे अठ्ठयाऐंशी पैसे पाचशे सत्याऐंशी फक्त) (३८.८५ %) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रकमेवर २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४२, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३३**

पुणे गणेश पेठ अल्पना सिनेमा समोरील वाहतनळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार अमित एंटरप्राईजेस, प्रो.प्रा. अमित शिवाजी जाधव यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ४,१०,६९०=७० (अक्षरी रक्कम रूपये चार लक्ष दहा हजार सहाशे नव्वद पैसे सत्तर फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ३,६०,२५५/– (अक्षरी रक्कम रूपये तीन लक्ष साठ हजार दोनशे पंचावन्न फक्त) पेक्षा रक्कम रूपये ५०,४३५=७० (अक्षरी रक्कम रूपये पन्नास हजार चारशे पस्तीस पैसे सत्तर फक्त) (१४ %) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रकमेवर + २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४३, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३४**

पुणे नारायण पेठ सि.स.नं. ७०९ व ७१० पै. जागेतील लक्ष्मी रोड वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार कविता रामचंद्र मोरे यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ६,०४,५४१/– (अक्षरी रक्कम रूपये सहा लक्ष चार हजार पाचशे एक्केचाळीस फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ४,०१,५५५/– (अक्षरी रक्कम रूपये चार लक्ष एक हजार पाचशे पंचावन्न फक्त) पेक्षा रक्कम रूपये २,०२,९८६/– (अक्षरी रक्कम रूपये दोन लक्ष दोन हजार नऊशे शहाऐंशी फक्त) (५०.५५ %) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे

कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रक्कम + २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४४, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३५**

पुणे स्टेशन, कै. तुकारामशेठ शिंदे वाहनतळामधील पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला व टेरेस येथील चारचाकी वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणेस देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार मे. डि.आर. सर्व्हिसेस, प्लॅट नं. ८०१, विंग बी, वर्दे सोसायटी, कल्याणीनगर, पुणे ४११००६ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ८१,०१,२४८/- (अक्षरी रक्कम रूपये ऐक्याऐंशी लक्ष एक हजार दानशे अठ्ठेचाळीस फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ५९,५६,८००/- (अक्षरी रक्कम रूपये एकोणसाठ लक्ष छप्पन हजार आठशे फक्त) पेक्षा रक्कम रूपये २१,४४,४४८/- (अक्षरी रक्कम रूपये एकवीस लक्ष चव्वेचाळीस हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) (३६ %) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रकमेवर २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४५, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३६**

पुणे भाऊ महाराज बोळ, शुक्रवार पेठ येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार हिमालय वेअर हौसिंग प्रा.लि. प्रो.प्रा. दत्तात्रय संभाजीराव धंगेकर यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये १,८०,५१०=७५ (अक्षरी रक्कम रूपये एक लक्ष ऐंशी हजार पाचशे दहा पैसे पंच्याहत्तर फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये १,१४,९७५/- (अक्षरी रक्कम रूपये एक लक्ष चौदा हजार नऊशे पंच्याहत्तर फक्त) पेक्षा रक्कम रूपये ६५,५३५=७५ (अक्षरी रक्कम रूपये पासष्ठ हजार पाचशे पस्तीस पैसे पंच्याहत्तर फक्त) (५७ %) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रक्कम + २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४६, दि. २/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३७**

पुणे शिवाजीनगर अंतिम भू.क्र. ५७६/२, ५७६/३, न.भू.क्रं. १२१६/२, १२१६/३ फर्ग्युसन रस्ता , मेलेनियम प्लाझा येथील वाहनतळ ३ वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश दिनांकापासून मक्ता पद्धतीने चालविणेकरिता व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार मे.हिमालया वेअर हौसिंग, गट नं. १३६४, पुणे-नगर रोड, नियर संगम हॉटेल, वाघोली, पुणे ४१२२०७ यांनी देऊ केलेली वार्षिक मक्ता रक्कम रूपये २५,१५,७५५=२० (अक्षरी रक्कम रूपये पंचवीस लक्ष पंधरा हजार सातशे पंचावन्न पैसे वीस फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये १८,४९,८२०/- (अक्षरी रक्कम रूपये अठरा लक्ष एकोणपन्नास हजार आठशे वीस फक्त) पेक्षा रक्कम रूपये ६,६५,९३५=२० (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख पासष्ठ हजार नऊशे पस्तीस पैसे वीस फक्त) ने जास्त असल्याने त्यांचेकडून सदर वाहनतळ निविदा टेंडर अटी शर्तीप्रमाणे कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी मक्ता पद्धतीने चालविणेस व प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१५३, दि. ७/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३८**

पुणे शिवाजीनगर अ/५७६/२, बी.न.भू.क्र. १२१६/२, बी फर्ग्युसन कॉलेज समोरील शिरोळे रोड येथील वाहनतळ ३ वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश दिनांकापासून मक्ता पद्धतीने चालविणेकरिता व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वाधिक दर देणारे निविदादार. मे. हिमालया वेअर हौसिंग, गट नं. १३६४, पुणे-नगर रोड, नियर संगम हॉटेल, वाघोली, पुणे ४१२२०७ यांनी देऊ केलेली वार्षिक मक्ता रक्कम रूपये १०,५९,५५८=५० (अक्षरी रक्कम रूपये दहा लक्ष एकोणसाठ पाचशे अठ्ठावन्न हजार पैसे पन्नास फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ७,३०,७३०/- (अक्षरी रक्कम रूपये सात लक्ष तीस हजार सातशे तीस फक्त) पेक्षा रक्कम रूपये ३,२८,८२८=५० (अक्षरी रक्कम रूपये तीन लाख अठ्ठावीस हजार आठशे अठ्ठावीस पैसे पन्नास फक्त) ने जास्त

असल्याने त्यांचेकडून सदर वाहनतळ निविदा टेंडर अटी शर्तीप्रमाणे कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी मक्ता पद्धतीने चालविणेस व प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१५४, दि. ७/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २३९**

पुणे शिवाजीनगर फा. प्लॉट नं . ६६०, जंगली महाराज रस्ता येथील वाहनतळ ३ वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश दिनांकापासून मक्ता पद्धतीने चालविणेकरिता व्यवस्थापन व संचलन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी निविदेतील सर्वात जास्त दराचे निविदादार मे. पी.बी.पी. ग्रुप ३९७/२७ ए, पोर्णिमा टॉवर शॅप ५, एसएस रोड, पुणे शहर, पुणे – ४११०४२ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये २२,५२,९५५=५६ (अक्षरी रक्कम रूपये बावीस लक्ष बावन्न हजार नऊशे पंचावन्न पैसे छप्पन फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये १८,४२,१५५/– (अक्षरी रक्कम रूपये अठरा लक्ष बेचाळीस हजार एकशे पंचावन्न फक्त) पेक्षा रक्कम रूपये ४,१०,८००=५६ (अक्षरी रक्कम रूपये चार लाख दहा हजार आठशे पैसे छपन्न फक्त) ने जास्त असल्याने त्यांचेकडून सदर वाहनतळ निविदा टेंडर अटी शर्तीप्रमाणे कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी मक्ता पद्धतीने चालविणेस व प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१५५, दि. ७/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४०**

पाणीपुरवठा विभागाअंतर्गत बहिरट वाडी परिसर, मॉडर्न कॉलोनी परिसर, भोसले नगर परिसर व इतर भागात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रोहित वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. २९,९९,६९०/– पेक्षा १२.०००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र. रू. २६,३९,७२७=२० पर्यंत काम करून घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु./१६३, दि. ९/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४१**

औंध क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पाणीपुरवठा विभागामार्फत विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रोहित वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र. रू. ४९,९९,३१६/– पेक्षा २४.०००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र. रू. ३७,९९,४८०=१६ काम करून घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु./१६४, दि. ९/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**टेंडर्स न मागविता ५ (२) (२) अन्वये प्रकरणे**

**विषय क्र. २४२**

पुणे महानगरपालिकेकरिता भांडवली मूल्याधारित कर प्रणाली लागू करण्याच्या अनुषंगाने मिळकत करासंबंधी विविध घटकांचा अभ्यास करणेच्या अनुषंगाने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/Tax/१६२,दि. ९/६/२०२२ चे पत्र.

१. गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकोनॉमिक्स ही संस्था शासकीय तसेच निमशासकीय संस्थांसाठी महाराष्ट्र शासनमान्य पॅनेलवरील शासन सहाय्यित पुण्यातील एकमेव संस्था आहे. सदरचे काम हे विशिष्ट प्रकारचे काम असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ नियम २ (२) नुसार गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकोनॉमिक्स या संस्थेस भांडवली मूल्याधारित कर प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी ४ महिने कालावधीकरिता करार करणेस व रक्कम रूपये २२,५७,१०४/– ( बावीस लक्ष सत्तावन्न हजार एकशे चार फक्त ) चार टप्प्यांमध्ये म्हणजेच कामाच्या सुरूवातीस अग्रीम रक्कम – २५ %, कामाच्या प्रगतीनुसार ४५ दिवसानंतर– २५%, कामाच्या पुढील प्रगतीनुसार ९० दिवसांनंतर – २५%, व कामाचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर – २५ %, प्रमाणे अदा करणेस.

२. सन २०२२–२३ च्या आर्थिक वर्षासाठी पुणे महानगरपालिकेकरिता भांडवली मूल्याधारित कर प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी खात्याकडे उपलब्ध असलेली ''संकीर्ण'' RE11G103 या अर्थशिर्षकावरील रक्कम रूपये २०,००,०००/– ( अक्षरी वीस लक्ष फक्त ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व प्रकरण ७ नियम २ अन्वये वर्गीकरणाने '' भांडवली मूल्यावर कर आकारणी करणेसाठी कायदेतज्ञ, व्हॅल्युअर, प्रशासकीय अधिकारी इत्यादी तद्नुषंगिक खर्च'' RE11G109 या अर्थशिर्षकावर उपलब्ध करणेस.

३. सदरचे काम विहित मुदतीत न केल्यास गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकोनॉमिक्स या संस्थेस कामाच्या एकूण रकमेवर दरमहा १०% दंड आकारणी करणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४३**

पुणे मनपाच्या वाहनांना लागणारे पेट्रोल व डिझेल इंधन खरेदी करावयाचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ५ मधील कलम २ (२) मधील तरतुदीचे अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्र. ११५७, दि. ०२/९/२०१४ अधिन राहून मे. फ्यूलोसिटी टेक प्रा.लि., कोल्हापूर यांचेकडून डिझेल इंधन खरेदी करणेकामी खालील बाब मा. स्थायी समितीच्या निदर्शनास आणेबाबत मा. महापालिका आयुक्तयांचे जा.क्र. मआ/मो.वा.वि./१६५, दि. ९/६/२०२२ चे पत्र.

१) पुणे मनपा मोटार वाहन विभागाकरिता मनपा वाहनांना लागणारे डिझेल हे इंधन मे. फ्यूलोसिटी टेक प्रा.लि., कोल्हापूर यांचेकडून खरेदी करणेस–

२) पुणे मनपा मोटार वाहन विभागाकरिता मनपा वाहनांना लागणारे डिझेल हे इंधन मे. फ्यूलोसिटी टेक प्रा.लि., कोल्हापूर यांना खरेदी करावयाचे डिझेल इंधनापोटी प्रोफार्मा इन्व्हाईस वर RTGS द्वारे रक्कम अदा करणेस–

३) मे. फ्यूलोसिटी टेक प्रा.लि., कोल्हापूर यांना प्रोफार्मा इन्व्हाईस द्वारे इंधन पुरविठ्यापूर्वी रक्कम अदा होणार असल्याने व पुणे मनपाच्या मागणीप्रमाणे पर्याप्त इंधन पुरवठा करणेबाबत त्याचे सोबत रू. ५००/– च्या स्टॅम्प पेपर वर हमी पत्र/करार करणेस –

४) मे. फ्यूलोसिटी टेक प्रा.लि., कोल्हापूर यांना डिझेल इंधन खरेदी पोटी देण्यात आलेली अँडव्हान्स रक्कम अर्थशिर्षक – आर–ई–२१ ए–१०३ २–पेट्रोल, डिझेल, ऑईल व सी.एन.जी. साठी खर्च या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकामधून अदा करणेस–

५) तसेच भविष्यात मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. किंवा बाहेरील खाजगी पंप किंवा बाहेरील खाजगी कंपनी यांचेकडे स्वस्त दरामध्ये इंधन उपलब्ध झाल्यास मनपाच्या वाहनांना लागणारे पेट्रोल व डिझेल इंधन खरेदी बाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ११५७, दि. ०२/०९/२०१४ मधील बाब क्र. ४ नुसार कार्यवाही करणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>**संकीर्ण**</u>

**विषय क्र. २४४**

आरोग्य खात्याकडे करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवकांना मुदतवाढ देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त तथा प्रशासक पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/१५२, दि. ६/६/२०२२ चे पत्र.

१) १ आय.सी.यु. फिजिशियन, १ वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस), ७२ वैद्यकीय अधिकारी (बी.ए. एम.एस), १३ फार्मासिस्ट, ३१ स्टार्फ नर्स या पदाच्या एकूण ११८ सेवकांना नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ४४ दिवसांच्या कालावधीकरिता ३ महिनेपर्यंत नेमणूक देणेस. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदांच्या एकूण १० सेवकांना मान्यतेच्या दिनांकापासून कार्यमुक्त करणेस.

२) सदर सेवकांना देण्यात येणारे वेतन हे RE17F147 - रूग्णालये व दवाखाने सुरू करणेकरिता सेवकांचा पगार या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

३) सदर नियुक्तीच्या कालावधीत कंत्राटी सेवकांना किरकोळ रजा प्रत्येक महिन्याला एक दिवस या प्रमाणात देणेस व त्याप्रमाणे आजारपणाच्या रजेची निकड भासल्यास अत्यावश्यक गरज म्हणून प्रत्येक महिन्याला एक दिवस ह्या प्रमाणात वैद्यकीय रजा देणेस.

४) सदर कालावधीमध्ये कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव कमी झाल्यास व खात्यास या सेवकांची गरज न भासल्यास सदर सेवकांची सेवा संपुष्टात आणणेस.

५) सदर कालावधीमध्ये सदर पदांची कायम स्वरूपाची भरती झाल्यास सदर सेवकांची सेवा संपुष्टात आणणेस.

६) सदर पदावरील सेवांकरिता संबंधित सेवकांकडून नव्याने करारनामे करून घेणेस.

७) आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४५**

पुणे मनपा हद्दीतील ड्रेनेज लाईन्सची साफसफाई यंत्राच्या साहाय्याने करणे कामी मे.अंकिता इंजिनीअर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुगप रक्कमेवर २.३०% कमी दराने ) वाढीव रक्कम रू. ९३,४७,९३६/– पर्यंत जीएसटी लागू असल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत आवश्यकतेनुसार करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (ई), यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१५७, दि. ७/६/२०२२ चे पत्र.

१) पुणे मनपा हद्दीतील ड्रेनेज लाईन्सची साफसफाई यंत्राच्या साहाय्याने करणे हे काम मे.अंकिता इंजिनीअर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुगप रक्कमेवर २.३०% कमी दराने ) वाढीव रक्कम रू. ९३,४७,९३६/– पर्यंत जीएसटी लागू असल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत अगर दि. १५/०७/२०२२ अखेर जे प्रथम पूर्ण होईल तोपर्यंत आवश्यकतेनुसार करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस–

२) प्रकरणी पुणे मनपा हद्दीतील ड्रेनेज लाईन्सची साफसफाई यंत्राच्या साहाय्याने करणे या कामाची आवश्यकता असल्याने या निविदेच्या वाढीव रक्कमेस मान्यता मिळेल या भरवश्यावर सदर निविदाची मान्य मूळ रक्कम संपलेनंतर म्हणजेच दि. १०/५/२०२२ पासून करण्यात येणाऱ्या कामास पश्चात मान्यता मिळणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४६**

पुणे शहरातील प्रमुख ड्रेनेज लाईन मधील गाळ भाडेतत्वावरील हायड्रॉलिक ग्रॅब मशिनद्वारे काढणे कामी मे.अंकिता इंजिनीअर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुगप रक्कमेवर ५.९०% कमी दराने ) वाढीव रक्कम रू. ३९,१६,९०८.७३ पर्यंत जीएसटी लागू असल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत आवश्यकतेनुसार करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (ई), यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१५८, दि. ७/६/२०२२ चे पत्र.

१) पुणे शहरातील प्रमुख ड्रेनेज लाईन मधील गाळ भाडेतत्वावरील हायड्रॉलिक मशिनद्वारे ग्रॅब काढणे हे काम मे.अंकिता इंजिनीअर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुगप रक्कमेवर ५.९०% कमी दराने ) वाढीव ५०% रक्कम रू. ३९,१६,९०८=७३ पर्यंत जीएसटी लागू असल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत अगर दि. १५/७/२०२२ अखेर जे प्रथम पूर्ण होईल तोपर्यंत आवश्यकतेनुसार करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

२) प्रकरणी पुणे शहरातील प्रमुख ड्रेनेज लाईन मधील गाळ भाडेतत्वावरील हायड्रॉलिक मशिनद्वारे ग्रॅब काढणे या कामाची आवश्यकता असल्याने या निविदेच्या वाढीव रक्कमेस मान्यता मिळेल या भरवश्यावर सदर निविदाची मान्य मूळ रक्कम संपलेनंतर म्हणजेच दि. ०८/५/२०२२ पासून करण्यात येणाऱ्या कामास पश्चात मान्यता मिळणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७**

टिडिआर कार्यप्रणाली राबविताना टप्पा क्र. १ महापालिका आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर भूसंपादन व व्यवस्थापन विभागाकडील भूसंपादनाची कार्यवाही कायमस्वरूपी वगळण्यासाठी टप्पा क्र.२ च्या वेळी मा. महापालिका आयुक्त/ मा. स्थायी समिती यांची भूसंपादन प्रकरणाच्या स्थितीनुसार मान्यता न घेता सदर अधिकार मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेसाठी विधी विभागाच्या अभिप्रायानुसार टीडीआर टप्पा क्र.१ महापालिका आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर भूसंपादनाची कार्यवाही कायमस्वरूपी वगळण्यासाठी टप्पा क्र. २ च्या वेळी महापालिका आयुक्त/ मा. स्थायी समिती यांची भूसंपादन प्रकरणाच्या स्थिती नुसार मान्यता न घेता सदर अधिकार अतिरिक्त महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात येत असलेची बाब माहितीस्तव निदर्शनास आणणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे मआ/भूसंपादन/१६० दि. ८/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>दाखल विषय</u>

**विषय क्र. २४८ त्वर्य**

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी झालेल्या रूग्णांच्या उपचारा प्रित्यर्थ संबंधित रूग्णालयातील रूग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करताना लागणारे इम्लान्ट, औषधे डिस्पोजेबल व इतर आवश्यक साधनसामुग्री खरेदी करणे. (टेंडर क्रमांक ३२ सन २१–२२) मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (जनरल) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/ १६६, दि. १०/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमा खर्चाचा विचार करता रक्कम रू. ९० कोटी १ वर्ष/३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. ९० कोटी ३० % प्रमाणे, मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषाप्रशा –५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१६७, दि. १०/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २५० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमा खर्चाचा विचार करता रक्कम रू. २१० कोटी १ वर्ष/३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. २१० कोटी ७० % प्रमाणे , मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषाप्रशा –५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१६८, दि. १०/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक १९/८/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**